# शासकीय तंत्रनिकेतन ,छत्रपती संभाजीनगर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत संस्था )
उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर ४३१००५
फोने : (0240) 2334724, (P) 2353644
E-mail: : principal.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in
website: www.gpabad.ac.in


जा.क्र./शातंछसं/ अभ्यासक्रम /NEP२०२०/ 257 दिनांक : 17/05/2024

परिपत्रक

**विषय :** आपल्या संस्थेतून अभियांत्रिकी पदविका चे अभ्यासक्रम (७ वी उजळणी ) प्रथम वर्ष उतीर्ण केलेल्या इच्छुक विद्यार्थ्यांना पदविका अभ्यासक्रम सोडण्याचा (Exit) पर्यायाबाबत.( NEP अभ्यासक्रम )

संदर्भ : १.महाराष्ट्र शासन ,उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचा दिनांक ०४.०७.२०२३ रोजीचा शासन निर्णय .
२. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ ,मुंबई यांचे जा.क्र .मरातंशिमं/D-५१/NEP 2020/२०२४/२८५५ दि:३.५.२०२४ .

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर या संस्थेने महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ ,मुंबई यांनी निर्धारित केलेले शैक्षणिक धोरण २०२० ची मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून ७ व्या उजळणी (NEP अभ्यासक्रम ) अंतर्गत पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुधारित करून प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम राबविण्यास सुरुवात केलेली आहे.

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय व परिपत्रकाच्या अनुषंगाने संस्थेच्या ७ व्या उजळणी (NEP) अभ्यासक्रमास प्रवेशित असलेल्या इच्छुक विद्यार्थ्यांना Multi Entry, Multi Exit ची तरतूद करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. सदरील निर्देशानुसार संस्थेत २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून लागू झालेल्या ७ व्या उजळणी अभ्यासक्रमास प्रवेशित असलेल्या व प्रथम वर्षानंतर पदविका अभ्यासक्रम सोडू इच्छितात अशा विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष उत्तीर्ण केल्यानंतर Learning & Assessment Scheme for I year exit course लागू राहील . अशा विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष उत्तीर्ण करणे व Learning & Assessment Scheme for I year exit course प्रमाणे ४ श्रेयांकाचा विभागाने निश्चित केलेला कोर्स पूर्ण करणे बंधनकारक राहील. उपरोक्त प्रमाणे अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम प्रथम वर्षानंतर **सोडीत (EXIT) असलेल्या विद्यार्थ्यांना संस्थेकडून "Certificate of Vocation" प्रदान करण्यात येईल.**

सर्व विभाग प्रमुख यांनी त्यांच्या विभागातील अधिव्याख्याता , विद्यार्थी व पालक यांना याबाबत पूर्णपणे अवगत करावे.

डॉ. आदेश एम. जिंतुरकर
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर

प्रत: सर्व विभाग प्रमुख व शैक्षणिक समन्वयक AE/AN/APM/CE/CO/DDGM/EE/ET/IT/ME/S&H विभाग.
परीक्षा विभाग/ग्रंथालय/वस्तीगृह मुलांचे / वस्तीगृह मुलींचे / श्री एस.जी. चव्हाण (अधि मा.तं) यांना वेब साईट वर प्रदर्शित करणेसाठी )

श्रेयांकाचा विभागाने निश्चित केलेला कोर्स